# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची पीएच.डी. प्रवेश पूर्व परीक्षा २४ ऑगस्टला

पुणे, ०९: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएच.डी. प्रवेश परीक्षेची (पेट) अर्ज प्रक्रिया दि. १० जुलै, २०२४ पासून सुरू होणार असून दि. १० ऑगस्ट, २०२४ पर्यंत अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे. सदर परीक्षा, केंद्रनिहाय संगणक प्रणालीवर शनिवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२४ रोजी पुणे, अहमदनगर व नाशिक शहरातील केंद्रामध्ये आयोजित करण्यात येणार आहे. याबाबतची सविस्तर माहिती वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच रिक्त जागांचा प्रवर्ग निहाय तपशील https://bcud.unipune.ac.in/phd_entrance/Applicant/SearchGuideVacancies.aspx या लिंकवर उपलब्ध आहे. तरी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये पीएच.डी. प्रवेशासाठी इच्छूक विद्यार्थ्यांनी ऑनलाईनद्वारे अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी. पीएच.डी. प्रवेशाविषयी संपूर्ण नियम, मार्गदर्शक सूचना, इ. माहिती पीएच.डी. ॲडमिशन ॲण्ड ट्रॅकींग पोर्टल (लिंक - https://bcud.unipune.ac.in/phd/Ph.D_Addmission/index.html) वर उपलब्ध आहे.